# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही- ४४१ २२२

## कृषि हवामान सल्ला पत्रक

## चंद्रपूर जिल्हा

क्र.कृ.ह.स./९५/कृ.सं.के./८६३/२०२३ दिनांक २८ नोव्हेंबर २०२३

| सिंदेवाही येथील मागील आठवड्यातील हवामान स्थिती दिनांक २१ ते २७ नोव्हेंबर २०२३ | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसाचा हवामान अंदाज दिनांक २९ नोव्हेंबर ते ०३ डिसेंबर २०२३ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१/११ | २२/११ | २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | २७/११ | दिनांक | २९/११ | ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ | ०३/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ४४.९ | १०.७ | २.८ | ५.२ | ०.० |
| ३१.० | ३०.५ | ३१.० | २८.५ | २९.० | २९.५ | २६.० | कमाल तापमान (अं.से.) | २३.८ | २४.२ | २६.९ | २७.६ | २८.५ |
| १८.५ | १९.० | १९.५ | १८.५ | १९.० | १८.० | १७.० | किमान तापमान (अं.से.) | १५.१ | १४.९ | १५.२ | १६.० | १६.३ |
| ७८ | ८० | ८२ | ८८ | ८३ | ९१ | ९० | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ९३ | ९१ | ८८ | ८५ | ८९ |
| ५० | ५५ | ५६ | ६५ | ६८ | ६५ | ७० | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ७० | ६८ | ६६ | ६७ | ६२ |
| ०.८ | ०.७ | ०.३ | ०.१ | ०.४ | ०.३ | ०.२ | वा-याचा वेग (किमी/तास) | ४ | ५ | ५ | ४ | ४ |
| निरभ्र | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | ढगाळ | ढगाळ | आंशिक ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ |

| पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील | पाऊस (मिमी) ०१/०६/२०२३ पासून आजपर्यंत |
|---|---|
| ०.० (०) | १२२५.४ (५३) |

| | |
|---|---|
| हवामान अंदाज | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार चंद्रपूर जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसात २९ नोव्हेंबर ते ०३ डिसेंबर २०२३ रोजी आकाश आंशिक ढगाळ ते ढगाळ राहून कमाल तापमान २३.८ ते २८.५ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १४.९ ते १६.३ अंश सेल्सिअस राहून दिनांक २९ नोव्हेंबर रोजी सर्वत्र ठिकाणी मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे तसेच दिनांक ३० नोव्हेंबर रोजी विरळ ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे तसेच दिनांक ०१ ते ०२ डिसेंबर रोजी तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी खूप हलका ते हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. |
| चेतावणी | चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक २९ नोव्हेंबर रोजी तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी विजांचाकडकडाट, मेघगर्जना व वादळ वारा (वेग ३०-४० किमी प्रति तास) व गारपीटीसह मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे तसेच दिनांक ३० नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर रोजी तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी विजांचाकडकडाट, मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे. |

| पिकांचे नाव | पिकाची अवस्था | शेतकऱ्यांना हवामान आधारीत कृषी सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | ➢ तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडन्याची शक्यता असून शेतकरी बंधूनी धान पिकांची मळणी राहिली असल्यास त्यांनी मळणी करून बियाणे सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी तसेच कापूस पिकाची वेचनी ताबडतोब करून घ्यावीत व सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ धान पिकाची मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या सहायाने झाकून ठेवावे.<br>➢ वादळवारा वाहण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी भाजीपाला, फळबागा आणि इतर पिकाला पिक वाढीची अवस्था बघून काठीचा आधार द्यावा.<br>➢ ढगाळ वातावरणासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाउस पडण्याची शक्यता असल्याने शेतकरी बंधूनी कीटकनाशकाची होणारे नुकसान टाळण्यासाठी रासायनिक बुरशीनाशक व किटकनाशकाची फवारणी कामे पुढे ढकलावे.<br>➢ तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडन्याची शक्यता असून शेतकरी बंधूनी रब्बी (गहू, हरभरा, मोहरी व करडी) पिकामध्ये ओलीत करू नये.<br>➢ पावसाचा अंदाज लक्षात घेता, कृषी उत्पन्न बाजार समिती मधील खरेदीदार व इतर शेतमाल खरेदीदारांनी शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल उघड्या जागेवर व न ठेवता शेड मध्येच साठवावा. |
| | | ➢ विजांचाकडकडाट, मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता असल्याने शेळ्या, मेंढ्या, व इतर जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. |
| | | ➢ शेतात काम करतांना मेघगर्जनेचा आवाज ऐकायला आल्यास पक्क्या इमारती किंवा सुरक्षित ठिकाणी जावे, झाडाखाली आसरा न घेता मोकळ्या मैदानावर झाडाच्या उंचीपासून दुप्पट ते चारपट अंतरावर आसरा घ्यावा. |
| | | ➢ विजांच्या ठिकाणांचे निरीक्षण करण्यासाठी दामिनी - लाईटनिंग अलर्ट (Damini : Lightning Alert) या मोबाईल ॲप चा वापर करावा तसेच विजांपासून बचावासाठी ॲप मध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचा उपयोग करावा. |
| गहु | पेरणी | ➢ बागायती उशिरा पेरणीसाठी पूर्णा, पीडीकेव्ही सरदार, एकेएडब्लू ४६२७ या वाणांचे हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा व्हिटावाक्स ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास या बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया केल्यानंतर त्या बियाण्यास अझाटोबॅक्टर २५० ग्रॅम व स्फुरद विरघडणारे जिवाणू खत (पि. एस. बी.) २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणे या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.<br>➢ पेरणीच्या वेळी बियाणे ५ सें. मी. पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घावी. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर १५ ते १८ सें.मी. ठेवावे.<br>➢ पेरणीच्या वेळी नत्र स्फुरद पालाश ४० किलो प्रति हेक्टरी द्यावे. |
| हरभरा | वाढीची अवस्था | ➢ हरभरा पिकाच्या पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी आवश्यकतेनुसार आंतरमशागतीची कामे करून पिक तणमुक्त ठेवावे त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे निंदणी करावी.<br>➢ घाटे अळीच्या एकात्मिक वेवस्थापणासाठी प्रती हेक्टरी २० पक्षी थांबे शेतामध्ये लावावे.<br>➢ घाटे अळीने आर्थिक नुकसानीची पातळी (१-२ प्रती मिटर ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि.ली. किंवा एच.ए.एन.पि.व्ही. (१x१०$^{९}$) पिओबी/मिली) ५०० एल.ई/हे. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के इसी २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| जवस | वाढीची अवस्था | ➢ जवस पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी विरळणी करून २५ दिवसांनी डवरणी तसेच आवश्यकतेप्रमाणे निंदणी करावी. |
| करडी | वाढीची अवस्था | ➢ करडी पिकाच्या पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी विरळणी करून दोन रोपात २० ते ३० सें. मी. अंतर ठेवावे आवश्यकतेनुसार १ ते २ वेळा निंदणी व डवरणी करावी.<br>➢ मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) आढळताच डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| मोहरी | वाढीची अवस्था | ➢ मोहरी पिकाच्या पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी विरळणी करून आवश्यकतेप्रमाणे निंदणी तसेच आंतरमशागतीची कामे करावी. |
| धान | लोंबी/ दाणे पक्क्वता | ➢ तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडन्याची शक्यता असून शेतकरी बंधूनी धान पिकांची मळणी राहिली असल्यास त्यांनी मळणी करून बियाणे सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ धान पिकाची मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या सहायाने झाकून ठेवावे. |
| तूर | फुले व शेंगा अवस्था | ➢ शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी पिक ५० टक्के फुलावर आल्याबरोबर पहिली फवारणी क्विनॉलफॉस २५ टक्के इसी १६ मि.ली. त्यानंतर १५ दिवसांनी दुसरी फवारणी इमामेक्टिन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| कापूस | बोन्डे भरणे/ पक्वता अवस्था | ➢ तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडन्याची शक्यता असून शेतकरी बंधूनी कापूस पिकाची वेचनी ताबडतोब करून घ्यावीत व सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ कापूस पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे तयार कापसाची वाणानुसार वेचणी वेचणी करून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा.<br>➢ पीक बोन्डे भरण्याचे अवस्थेत असतांना २ टक्के डिएपी (२०० ग्रॅम डिएपी + १० लिटर पाणी) मिसळून फवारणी करावी.<br>➢ कपाशी पिकामध्ये गुलाबी बोंडअळीचा ५ ते १० प्रादुर्भाव आढळून आल्यास क़्विनॉलफॉस २५ टक्के एएफ २५ मि.ली. किंवा क्लोरपायरीफॉस २५ टक्के २५ मिली किंवा प्रोफेनोफोस ५० टक्के ईसी ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | फुल ते फळ | ➢ ढगाळ वातावरणामुळे फुल किडे व कोळीच्या नियंत्रणासाठी ईमामेक्टीन बेनझाइट ५ टक्के ४ ग्रम प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| पशुपालन सल्ला | | ➢ जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोठ्यामध्ये/सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ४ ते ६ इंच जाडीचे भाताचा पेंढा, गव्हाचा पेंढा, करावातीचे धूळ इत्यादीचे बेडिंग करावे. जनावरांच्या गोठ्याचा व जमिनीचा भाग कोरडा व स्वच्छ ठेवावा.<br>➢ जनावरांना पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या पाण्याची कुंड/ साधने याची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी.<br>➢ रब्बी हंगामात घेणा-या पशुधनासाठी मका, ओट, बरशीम लसूण घास व ज्वारी चारा पिकाची लागवड करावी. |
| कुक्कुटपालन सल्ला | | ➢ कुक्कुट्पालनामध्ये थंडीच्या दिवसात पक्षांना उबेची आवश्यकता जास्त असते म्हणुन पिवळ्या प्रकाशाच्या बल्बची संख्या किंवा आवश्यकतेनुसार जमिनीपासुन उंची बदलवत रहावी तसेच शेडला गोणपाट/पोत्यांचे पडदे लावून थंडीपासून संरक्षण करावे.<br>➢ कोंबड्यांच्या घरामध्ये हवा नेहमी खेळती असावी. थंड किंवा गरम हवेचा झोत सरळ त्यांच्यावर येऊ देऊ नये. |
| टिप | | ➢ रासायनिक तननाशक व किटकनाशकाची फवारणी करताना आवश्यक काळजी घ्यावी. |
| ➢ हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० | | |

| |
|---|
| वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |
| .शेतकरी बंधुनो सप्रेम नमस्कार, वर्ष २०२३ मधील ग्रामीण कृषि मौसम सेवा सल्ला पत्रक नोंदणीसाठी आपले नाव, गाव,पत्ता, मोबाईल नंबर इत्यादी माहिती ई-मेल aassindewahi@gmail.com किवा मोबाईल नंबर ९६२३३६०३२७ वर संपर्क साधावा. |

| | |
|---|---|
| | प्रकल्प समन्वयक<br>ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र,<br>सिंदेवाही जि. चंद्रपूर |